# आयआयएफएल ॲसेट मॅनेजमेंटने लाँच केला दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी आयआयएफएल कॅपिटल एनहान्सर फंड- सीरिज १

**मुंबई, ११ एप्रिल २०१८:** आयआयएफएल ॲसेट मॅनेजमेंट लिमिटेडने (आयआयएफएल एएमसी) आज आयआयएफएल कॅपिटल एनहान्सर फंड सीरिज-१ची (इक्विटी आणि इक्विटीशी संबंधित सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करणारी एक वार्षिक इंटर्वल योजना) ("द स्कीम") घोषणा केली. समभागांचे दर चढे असताना होणारे सर्व फायदे मिळवून देणे व बाजार उतरणीला लागला असता संरक्षण देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेची रचना वार्षिक मध्यंतर (इंटर्वल) योजना अशी करण्यात आली असून, इक्विटी व इक्विटीशी संबंधित सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करून आणि निफ्टी 50 पुट ऑप्शन व अन्य इक्विटी डेरिएटिव्हजच्या मदतीने फंडाचे संरक्षण करून दीर्घकालीन भांडवली अधिमूल्य (ॲप्रिसिएशन) प्राप्त करणे हे या योजनेचे लक्ष्य आहे.

गुंतवणूकदार इक्विटीवर निश्चित असे उत्पन्न मिळण्यास प्राधान्य देतात हे भारतातील मालमत्ता गुंतवणुकीच्या चित्रावरून दिसून येते. निश्चित उत्पन्नामुळे नियमित व स्थिर परतावा मिळत राहतो तसेच भांडवल सुरक्षित राहते अशी सर्वसाधारण धारणा आहे, तर इक्विटी म्हटले की त्यात एक धोक्याची बाजू असते. मात्र, इक्विटीतील गुंतवणूक छोट्या कालावधीमध्ये अस्थिर वाटली, तरी दीर्घकाळात ती मोठी संपत्ती निर्माण करणारी ठरते या तथ्याकडे गुंतवणूकदार पुरेसे लक्ष देत नाहीत.

**आयआयएफएल ॲसेट मॅनेजमेंट बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अमित शहा म्हणाले:** *"इक्विटीतील जोखमींबाबत गुंतवणूकदारांच्या भावना आयआयएफएल ॲसेट मॅनेजमेंटला समजतात आणि त्यांची काळजी दूर करण्यासाठी आम्ही काही सुधारित वैशिष्ट्यांसह योजना आणली आहे. आयआयएफल कॅपिटल फंड एन्हान्सर सीरिज १ ही योजना 'पुट ऑप्शन'मध्ये गुंतवणूक करून बाजारपेठेतील करेक्शनमुळे येणाऱ्या उतरणीपासून पैशाचे रक्षण करण्याच्या उद्दिष्टाने तयार करण्यात आली आहे. गुंतवणूक योजनांना मिळणाऱ्या परताव्याचा ९५ टक्के भाग मालमत्तेच्या योग्य वितरणावर अवलंबून असतो, तर केवळ पाच टक्के उत्पादनाच्या निवडीवर अवलंबून असतो, हे आम्हाला अभ्यासाअंती लक्षात आले आहे. आयआयएफएल कॅपिटल एन्हान्सर फंड- सीरिज १चे उद्दिष्ट दीर्घकालीन गुंतवणूकदारांना तात्पुरत्या अस्थिरतेकडे दुर्लक्ष करून मालमत्तेच्या योग्य वितरणावर लक्ष केंद्रित करण्याची मुभा देणे हे आहे."*

ही योजना प्रामुख्याने मोठ्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करेल आणि निफ्टी 50 पुट ऑप्शनच्या मदतीने गुंतवणुकीचे संरक्षण करेल. यामुळे गुंतवणूकदारांना 'किमान जोखीम आणि चढ्या किमतीचा कमाल फायदा' असे लक्ष्य ठेवून गुंतवणूक करण्याचे स्वातंत्र्य मिळेल. बाजारपेठेतील घसरणीचा तोटा मर्यादित ठेवून आणि अनपेक्षित तेजीचा फायदा करून देत अतिरिक्त परतावा निर्माण करण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे. वार्षिक

मध्यंतराच्या सुविधेमुळे गुंतवणूकदारांना दरवर्षी विशिष्ट व्यवहार कालखंडात खरेदी करणे किंवा व्यवहारातून बाहेर पडणे शक्य होणार आहे.


**आयआयएफएल ॲसेट मॅनेजमेंट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि या योजनेचे फंड व्यवस्थापक श्री. प्रशस्त सेठ म्हणाले**: *“कॅपिटल एन्हान्सर फंड- सीरिज १ हा आमच्या गुंतवणूकदारांच्या गरजांना अनुकूल असा फंड आहे. भारत सध्या खूपच रोमांचक अशा टप्प्यातून जात आहे; लोकांना हळुहळू दीर्घकालीन गुंतवणुकीचे मोल समजू लागले आहे आणि त्यातील जोखमींबाबतही ते खुलेपणाने विचार करू लागले आहेत. आमची नवीन योजना सर्व धोके कमी करून गुंतवणूकदारांना निश्चिंत करण्याच्या उद्देशानेच विकसित करण्यात आली आहे. आयआयएफएल ॲसेट मॅनेजमेंटने नेहमीच नियमित उत्पादनांपासून वेगळे असे काहीतरी देऊन या क्षेत्रात स्वत:चे वेगळे असे स्थान निर्माण केले आहे. आमची पर्यायी गुंतवणूक फंड प्रकारातील मागील योजना आयआयएफएल स्पेशल ऑपॉर्च्युनिटीज फंड आयपीओपूर्व आणि आयपीओ क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणारी भारतातील पहिलीच योजना होती. या योजनेत १.१ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक झाली असून (३१ डिसेंबर २०१७ रोजी उपलब्ध आकडेवारी) तो देशातील सर्वांत मोठा एआयएफ झाला आहे.”*

भारत लवकरच गुंतवणुकीसाठी जगातील पाचव्या क्रमांकाची आकर्षक बाजारपेठ होणार आहे. जागतिक आर्थिक वाढीसंदर्भातील चित्र आतापर्यंत कधीही नव्हते एवढे आशादायी दिसत आहे आणि भारतातील परिस्थिती तर त्याहून चांगली आहे. पारंपरिक उत्पादनांहून वेगळी, कल्पक उत्पादने सर्व मालमत्ता क्षेत्रांत आणून तसेच एक सर्वंकष दृष्टिकोन ठेवून बाजारपेठेत स्वत:चे स्थान भक्कम करण्यासाठी आयआयएफएल एएमसी प्रयत्न करत आहे. गुंतवणूकदारांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देणारी व त्यातील जोखीम कमीत कमी ठेवणारी उत्पादने देण्याच्या दिशेने कॅपिटल एन्हान्सर फंड- सीरिज १ हे एक पाऊल आहे.

भांडवली नफा सुधारण्याचे उद्दिष्ट असलेले गुंतवणूकदार तसेच बाजारात प्रथमच गुंतवणुकीचा विचार करणारे नवीन गुंतवणूकदार आयआयएफएल एन्हान्सर फंड- सीरिज १अंतर्गत नियमित किंवा थेट योजनेत (किंवा योजनांमध्ये) गुंतवणूक करू शकतात. हा फंड खरेदी करण्यासाठी किमान रक्कम ५००० रुपये आहे.

**या बाबींच्या शोधात असलेल्या गुंतवणूकदारांसाठी हे उत्पादन अनुकूल***

-

| | |
|---|---|
| दीर्घकालीन भांडवली वाढ<br>- इक्विटी आणि इक्विटीशी संबंधित सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक आणि निफ्टी 50 पुट ऑप्शन तसेच अन्य डेरिएटिव्हजची खरेदी करून संरक्षणाचे धोरण; | <br><br>मुद्दलाला मध्यम स्वरुपाची जोखीम आहे हे गुंतवणूकदारांनी समजून घेतले पाहिजे |

उत्पादन आपल्यासाठी अनुकूल आहे की नाही याबद्दल शंका वाटत असल्यास गुंतवणूकदारांनी त्यांच्या वित्तीय सल्लागारांचा सल्ला घेऊन खात्री करून घ्यावी.

---

**आयआयएफएल ॲसेट मॅनेजमेंट लिमिटेडविषयी**

आयआयएफएल ॲसेट मॅनेजमेंट लिमिटेड हा आयआयएफएल इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्सचा भाग आहे. आयआयएफएल ॲसेट मॅनेजमेंट (आयआयएफएल एएमसी) ही जागतिक मालमत्ता व्यवस्थापन कंपनी बाजारपेठेतील वातावरणाला अनुकूल अशी वेगळी गुंतवणूक उत्पादने देण्याच्या उद्देशाने २००८ मध्ये स्थापन करण्यात आली. आयआयएफएल ॲसेट मॅनेजमेंट व्यवसाय म्हणजे आयआयएफएल इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्सद्वारे त्यांच्या सिंगापूर, भारत आणि मलेशियांतील कंपन्यांमार्फत चालवले जाणारे परवानाप्राप्त मालमत्ता व्यवस्थापन उपक्रम आहेत. आयआयएफएल एएमसीचे वेगळे म्युच्युअल फंड्स आणि व्हेंचर कॅपिटल फंड्स यांमध्ये सार्वजनिक व खासगी समभाग, निश्चित उत्पन्न देणाऱ्या सिक्युरिटीज आणि रिअल इस्टेटचा समावेश होतो. कंपनीच्या आगळयावेगळया उत्पादनांमध्ये तीक्ष्ण उद्योजकता, चापल्य आणि वेगवान कार्यात्मकता ही वैशिष्ट्ये आहेत.

***"म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बाजारपेठेतील धोक्यांवर अवलंबून आहे, योजनेशी संबंधित सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा"***

अस्वीकृती : या प्रसिद्धी पत्रकामध्ये असलेल्या माहितीच्या तयारीसाठी एएमसीने सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेल्या माहितीसोबतच अंतर्गत तयार करण्यात आलेल्या माहितीचा उपयोग केला आहे. गोळा करण्यात आलेली माहिती व या प्रसिद्धी पत्रकामध्ये वापरण्यात आलेली माहिती विश्वसनीय स्रोतांकडून मिळाल्याचे मानण्यात आले आहे. पण एएमसी कोणत्याही माहितीची अचूकता, विश्वसनीयता आणि / किंवा परिपूर्णतेची जबाबदारी घेत नाही. आम्ही या प्रसिद्धी पत्रकामध्ये ज्यामध्ये 'असेल', 'शिवाय', 'केले असेल', 'विश्वास' यांसारखे शब्दे किंवा वाक्ये आणि अशाच प्रकाराची पैलू किंवा विविध प्रकाराची पैलू, जी 'भविष्यकालीन विधाने' आहेत यांचा समावेश केला आहे. आमच्या सेवा आणि / किंवा गुंतवणूका, भारताची आर्थिक व व्याजविषयक धोरणे, महागाई, व्याजदर, परकीय विनिमय दर, इक्विटी किंमती किंवा इतर दर किंवा किमतींमध्ये अनपेक्षित बदल इत्यादींवर परिणाम करणाऱ्या भारतातील व जागतिक स्तरावरील इतर देशांमधील बाजारपेठा जोखीम, सामान्य आर्थिक व राजनैतिक स्थितींनुसार आमच्या अपेक्षांशी संबंधित जोखीम किंवा अनिश्चिततांमुळे अस्सल परिणाम भविष्यकालीन विधानांपेक्षा वेगळे असू शकतात. एएमसी (तिच्या संलग्न संस्थेसह), म्युच्युअल फंड, ट्रस्ट आणि त्यांचे कोणतेही अधिकारी, संचालक, व्यक्ती व कर्मचारी हे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, दंडात्मक, विशेष, अनुकरणीय, परिणामी कोणत्याही स्वरुपाच्या नुकसानासाठी, तसेच कोणत्याही पद्धतीने या माहितीच्या वापरामधून निर्माण होणाऱ्या फायद्यामधील नुकसानासाठी जबाबदार नसतील. फक्त प्राप्तकर्ताच या माहितीसंदर्भात घेण्यात आलेल्या कोणत्याही निर्णयासाठी पूर्णपणे जबाबदार

असेल/ जबाबदार आहे. योजनेचा पोर्टफोलिओ योजनेच स्किम इन्फर्मेशन पत्रकाच्या तरतुदींअंतर्गत बदलू शकते. गुंतवणूका पद्धत, धोरण व जोखीम घटकांसाठी कृपया एसआयडीचा संदर्भ घ्या. आयआयएफएल म्युच्युअल फंडाचे युनिट्स सबस्क्राईब करण्यामधील संभाव्य कर, कायदा व इतर आर्थिक परिणाम जाणून घेण्यासाठी गुंतवणूकदारांनी त्यांचे स्वतःच्या कायदा, कर व आर्थिक सल्लगारांचा सल्ला घ्यावा.